MHKO110008442012

**नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१२ मधील नि. क्र. १४३ खालील आदेश**

**नाना कांबळे वगैरे**

**वि.**

**हिराबाई कांबळे वगैरे.**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचे वारसांना रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल करून अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी क्र. ३ चे मयत वारस ३(२) कै. विकास सीताराम कांबळे हे दि. २२/०७/२०२४ रोजी मयत झालेले असून त्यांना खालील प्रमाणे वारस आहेत-

| अ. क्र. | वारसाचे नाव व पत्ता | प्रतिवादीशी नाते |
|---|---|---|
| १ | वैशाली विकास कांबळे,<br>वय – ४० वर्षे, धंदा- गृहीणी,<br>रा. तळसंदे, ता. हातकणंगले , जि. कोल्हापूर. | पत्नी |
| २ | विहासी विकास कांबळे,<br>वय – २२ वर्षे, धंदा- शिक्षण,<br>रा.सदर. | मुलगी |
| ३ | संचिता विकास कांबळे,<br>वय – २० वर्षे, धंदा- शिक्षण,<br>रा. सदर. | मुलगी |

**०३.** सदरचे वारस सोडून मयत वादी क्र. ३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांना दुसरे कोणीही वारस नाहीत. तरी दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेकरीता वादी क्र.३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांचे वर नमूद वारसांना सदर कामी रेकॉर्डवर घेणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यांनी प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, सी.पी.सी. ऑर्डर २२ रूल ९ प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेता येत नाही. मयत यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास १ वर्ष १ महिना व ११ दिवसांचा विलंब वादी यांनी केलेला आहे. सदरचा अर्ज मुदतीत नाही. सबब अर्ज खर्चासहीत नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदरचा दावा हा हक्कापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी क्र.३(२) हे दि. २२.०७.२०२४ रोजी मयत झाले असून मर्यादा कायदा, १९६३ चे आर्टीकल १२० नुसार वादींनी प्रस्तुतचा अर्ज ९० दिवसांच्या आत म्हणजे दि. २१.१०.२०२४ पर्यंत दाखल करणे गरजेचे होते. तथापि, सदरचा अर्ज दाखल करणेस वादी यांनी १ वर्षाहून अधिक विलंब केलेला आहे. तसेच अर्ज ऑर्डर २२ रूल २ खाली न देता तो ऑर्डर २२ रूल ९ खाली दिला आहे.

**०६.** परंतु, मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिंडींग टाळण्याकरीता व काम गुणदोषांवर चालून निकाली होणेकरीता मयत वादी क्र.३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांचे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर घेणेस झालेल्या विलंबाकडे दुर्लक्ष न करता प्रतिवादी यांना भरपाई करणे आवश्यक आहे. सबब, न्यायाच्या कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे-

# आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा नि. १४३ खालील अर्ज वादीने रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो. |

स्वाक्षरी/-

**दिनांकः- ११.०९.२०२५**
**पेठवडगाव**

**( आर. एस. मोरे )**
**३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**पेठवडगाव.**